# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २६८/२०२४ दिनांक:- १९/०७/२०२४.

## "एका महिला वेश्यादलालास ताब्यात घेवुन दोन पिडित मुलींची सुटका करण्यास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकास यश"

दिनांक १८/०७/२०२४ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदरला बातमीदाराकडुन महिला नामे सुरेखा उर्फ दिदी परब हि वेश्याव्यवसाय करीत असुन तिचा मोबाईलवर पुरुष गिऱ्हाईकाने संपर्क साधला की, ती गिऱ्हाईकांशी संभाषण करुन पैशाच्या मोबदल्यात वेश्यागमनासाठी मुली पुरविते.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक व दोन पंच बोलावुन वेश्यादलाल सुरेखा उर्फ दिदी रविंद्र परब हिने सांगितल्याप्रमाणे राधा क्रिष्णा व्हेज रेस्टॉरंट, इंदिरा नर्सींग होमच्या समोर, सेक्टर ०७, शांतीनगर, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन १३.५५ वा. छापा टाकला असता, यातील महिला वेश्यादलाल नामे सुरेखा उर्फ दिदी रविंद्र परब, वय-४९ वर्ष, रा. रुम नं. सी/१३ अनिकेत बिल्डींग नं. ०९, तलाव रोड भाईंदर पुर्व ता.जि.ठाणे हिने ०२ पिडीत मुलींना वेश्यागनमासाठी प्रवृत्त करुन वेश्यागमनाची रक्कम ठरवुन स्वत:च्या उपजिवीकेकरीता रक्कम स्वत: स्वीकारल्याने तिस सापळयातील रोख रक्कम व इतर मुद्देमालसह ताब्यात घेवुन ०२ पिडित मुलींची सुटका करण्याा आली आहे. सदर बाबत सफौ उमेश पाटील यांनी ताब्यातील महिला वेश्यादलाल आरोपी नामे सुरेखा उर्फ दिदी परब हिचेविरुध्द सरकार तर्फे फिर्यादी दिल्याने नयानगर पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. ३२१/२०२४, भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १४३(३), सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे दिनांक १८/०७/२०२४ रोजी गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.समीर अहिरराव, सफौ/उमेश पाटील, राजु भोईर, शिवाजी पाटील, रामचंद्र पाटील, पोहवा/किशोर पाटील, पोशि/ शिंदे, राजपुत, चालक पोहवा/सम्राट गावडे, मपोशि/भिलारे, जाधव व मसुब/अश्विनी वाघमारे, सर्व नेम. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष- भाईंदर यांनी केली आहे.